# माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
# महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई

नवीन प्रशासकीय भवन, १७ वा मजला, आस्थापना शाखा, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालयासमोर,
मुंबई- ४०० ०३२, दूरध्वनी क्रमांक – २२०२३१६१.

---

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्रमांक संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १७.१२.२०१६ अनुसार, **माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई येथे** शासकीय/निमशासकीय सेवेतून गट-अ अथवा गट-ब या पदावरुन, रूपये ७,६००/- ग्रेड पे पेक्षा कमी (सहाव्या वेतन आयोगानुसार) संवर्गीय सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने "विवक्षित स्वरुपाचे काम" करण्यासाठी नामिकासूची तयार करण्याकरिता अर्ज मागविण्यात येत आहेत.

"विवक्षित स्वरुपाचे काम" करण्यासाठी, नामिकासूची तयार करण्याकरिता पुढीलप्रमाणे आवश्यक बाबी नमूद करण्यात येत आहे.

**विवक्षित सेवा/कामाचे स्वरूप :**

१) माहिती व जनसंपर्क महासंचालनालय मनुष्यबळ व्यवस्थापन, मनुष्यबळ भरती, कायदेशीर/न्यायालयीन प्रक्रिया यासाठी तांत्रिक आणि कायदेशीर सल्ला देणे.

२) महासंचालनालयाच्या मुख्यालयातील आणि क्षेत्रीय कार्यालयासाठी वित्तीय बाबी, प्रशासकीय बाबी, प्रशासकीय गतिमानतेसाठी, कामकाज नियोजनासाठी उपाय सुचविणे, त्याच्या अंमलबजावणीसाठी कार्यप्रणाली निश्चित करणे.

३) माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या विविध धोरणात्मक बाबी निश्चित करण्यासाठी वैधानिक, तांत्रिक आणि अनिवार्य मुद्यांबाबत मार्गदर्शन करणे.

४) माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील अधिकारी आणि कर्मचारी यांच्या प्रशिक्षण धोरणाबाबत मार्गदर्शन करणे. यामध्ये विधीमंडळ कामकाज आणि माहितीचा अधिकार यांचा समावेश असेल.

५) महासंचालनालयाच्या सर्व शाखांमार्फत प्रशासकीय, वित्तीय आणि इतर मान्यतेकरिता शासनास सादर करण्यात आलेल्या प्रस्तावांबाबत सामान्य प्रशासन विभाग/वित्त विभाग/नियोजन विभाग यांच्याकडे पाठपुरावा करणे. त्यांच्याशी समन्वय साधणे आणि त्यांच्याकडून प्राप्त झालेल्या त्रुटींचे निराकरण करून, प्रस्ताव परिपूर्ण करणे.

**वय, अर्हता व अनुभव :**

१. उमेदवाराची वयोमर्यादा कमाल ५९ ते ६४ वर्षापर्यंत असावी.

२. उमेदवाराकडे प्रशासकीय आणि माहिती व जनसंपर्क क्षेत्रातील संबधित पदावरील कामाचा किमान ३ वर्षाचा अनुभव असावा.

३. करार पध्दतीने नियुक्त करावयाचा सेवानिवृत्त अधिकारी शारीरिक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा, तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

४. करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी यांच्याविरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कार्यवाही चालू प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी.

**पदसंख्या** : एकूण-१ पद
(पदांची संख्या कमी/जास्त करण्याचे अधिकार महासंचालनालयाकडे राखून ठेवण्यात येत आहेत.)

**कालावधी** : १ वर्षाकरिता (आवश्यतेनुसार कालावधी कमी/जास्त नूतनीकरण करता येईल)

**मासिक पारिश्रमिक** : शासन निर्णय दि.१७.१२.२०१६ मधील ड (१) अनुसार देय राहिल.

**इतर अटी व शर्ती** : शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १७.१२.२०१६ अन्वये विनियमित करण्यात आलेल्या सर्व अटी व शर्ती लागू राहतील.

इच्छुक सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी त्यांचे अर्ज, आवश्यक त्या शैक्षणिक अर्हता व अनुभवाच्या प्रमाणपत्रासह ही जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ७ कार्यालयीन दिवसांच्या आत उपरोक्त कार्यालयात सादर करावेत. पोस्टामार्फत विहित कालावधीनंतर प्राप्त होणारे अर्ज स्विकारण्याचे/नाकारण्याचे तसेच निवड प्रक्रिया बाबतचे सर्वअधिकार महासंचालनालयाकडे राखून ठेवण्यात येत आहेत.

**महासंचालक**
**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय**

---